वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ २६०४ /२०२५ दिनांक :- २८/०३/२०२५

# प्रसिध्दीपत्रक

दिनांक ३१/०३/२०२५ अथवा दिनांक ०१/०४/२०२५ रोजी (चंद्र दर्शनानुसार जाहीर केलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर किंवा पुढे) रमजान ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामुहिक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यावेळी ईदगाहचे जवळपास मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते. त्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे राहणे, याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए. ०१९६/८७१/ सीआर-३७/टिआरए-२, दिनांक- २७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर सदर परिसरातील वाहतूकीत अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करीत आहे.

**ईदगाह मैदान गोळीबार मैदान चौक येथे होणा-या नमाज पठणाच्या कार्यक्रमासाठी दिनांक ३१/०३/२०२५ अथवा दिनांक ०१/०४/२०२५ रोजी ( चंद्र दर्शनावर ) सकाळी ०६.०० वा. ते ११.३० वा. नमाज पठण पूर्ण होईपर्यंत सदर ठिकाणी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी आवश्यकते नुसार वाहतूक वळविण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरुन जाणा-या वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.**

➢ **सोलापुर रोड वरील भैरोबानाला चौक ते गोळीबार मैदान चौक दरम्यानची वाहतुक सकाळी ०६.०० ते ११.३० पर्यत बंद राहील.**

**पर्यायी मार्ग** - सोलापुर कडुन स्वारगेटला जाणारी जड वाहने (फक्त मार्केटयार्डकरीता) व इतर वाहने ही भैरोबानाला चौकातुन डावीकडे वळुन प्रिन्स ऑफ वेल्स रोडने लुल्लानगर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच पुणे स्टेशन व पुणे शहरात जाणारी जड वाहने यांना पुर्णतः बंदी असुन हलकी वाहने इम्प्रेस गार्डन रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

➢ **मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक दरम्यानची वाहतुक पुर्णतः वरील वेळेत बंद राहील**

➢ **सीडीओ चौकातुन गोळीबार चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक वरील वेळेत बंद राहील.**

**पर्यायी मार्ग** - लुल्लानगर कडुन येणारी वाहने सीडीओ चौकातुन डावीकडे वळुन इच्छित स्थळी जातील. तसेच खटाव बंगला चौकातुन उजवीकडे वळुन नेपीयर रोडने मम्मादेवी चौकातुन सरळ बीशप स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील. त्याकरीता खटाव बंगला चौकातील राईट टर्न तात्पुरता सुरु करण्यात येईल.

➢ **स्वारगेट कडुन सोलापुर कडे जाणारी वाहने ही सेव्हन लव्हज चौक ते गोळीबार चौक दरम्यान वरील वेळेत पुर्णतः बंद राहतील**

**पर्यायी मार्ग** - स्वारगेट कडुन येणारी वाहने सेव्हन लव्ह चौकातुन उजवीकडे वळुन सॅलेसबरी पार्क रोडने सीडीओ चौकात येवुन उजवीकडे वळुन खटाव चौकात डावीकडे वळुन इच्छित स्थळी जातील. अगर खटाव चौकातुन लुल्लानगर मार्गे सोलापुरला जातील.

➢ **जुनी सोलापुर बाजार चौकी चौक ते गोळीबार चौक दरम्यानची वाहतुक वरील वेळेत पुर्णतः बंद राहील**

**पर्यायी मार्ग** - खाणे मारुती चौकाकडुन येणारी वाहने पुलगेट डेपो मार्गे सोलापुर बाजार चौक सरळ नेपीयर रोडने खटाव बंगला मार्गे इच्छित स्थळी जातील.तसेच मम्मादेवी मार्गे सोलापुर कडे जातील.

➢ **लुल्लानगर चौकातुन गोळीबार चौकाकडे येणारी जड वाहने पुर्णतः बंद राहतील.**

याखेरीज शहरातील अन्य भागातील ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार असल्याने सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी वाहतुक पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रति,**

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक ,** पुणे शहर.

**३)पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४) प्रभारी अधिकारी वानवडी, लष्कर,स्वारगेट** वाहतुक विभाग, पुणे शहर.

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.